# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-३२ दिनांक - ०४/०२/२०२४

**०४ किलो ४०० ग्रॅम वजनाच्या गांजा या अंमली पदार्थासह सुमारे १,०२,४२०/- रु किमंतीच्या मुद्देमालासह आरोपीत यास गजाआड करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश.**

---ooo---

दिनांक ०२/०२/२०२४ रोजी सांयकाळी २१.०० वा सुमारास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.जितेंद्र वनकोटी, पेल्हार पोलीस ठाणे यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, एक इसम वसई फाटा,वसई पुर्व ता.वसई जि.पालघर येथे गांजा नावाचा अंमली पदार्थ विक्री करीता येणार असल्याची खात्रीशिर माहिती मिळाली.

सदर बातमीची खात्री करुन मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.जितेंद्र वनकोटी यांनी लागलीच सदर कारवाई साठी पोलीस निरीक्षक श्री.शिवानंद देवकर यांना आदेशीत केले. पोनि/शिवानंद देवकर व पोउपनि/तुकाराम भोपळे व स्टाफ यांनी मिळुन मुंबई-अहमदाबाद हायवे रोड क्रमांक ०८, गुजरात मुंबई वाहिनीचे सर्व्हिस रोड, वसई फाटा, वसई पुर्व ता.वसई जि.पालघर येथे सापळा रचुन सदर ठिकाणी गांजा या अमंली पदार्थाची बेकायदेशिर रित्या विक्री करण्या करीता घेवुन येत असलेला इसम नामे - संजय मोहनसिंग जाट वय - ३१ वर्ष रा. वालीव वसई पुर्व ता.वसई जि.पालघर, यास सुमारे ०४ किलो ४०० ग्रॅम वजनाचा सुमारे ९२४००/- रु किंमतीच्या गांजा व एक मोबाईल फोन असा एकुण १,०२,४२०/- रुपये किंमतीच्या मुद्देमालासह जागीच ताब्यात घेतले. असुन सदरबाबत पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि.नंबर ११०/२०२४ एन.डी.पी.एस. का.क ८ (क) २०( ब) ll (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री.शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउपनि/तुकाराम भोपळे, पोहवा/तानाजी चव्हाण, पोअं/रवि वानखेडे,राहुल कर्पे,दिलदार शेख, निखिल मंडलिक, अनिल साबळे,यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.


मिरा - भाईंदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालय
पेल्हार पोलीस ठाणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव